# मराठी भाषा कौशल्ये आणि व्यवसायाच्या संधी

- डॉ. सुनीता सांगोले -

**उद्दिष्टे**

- मराठी भाषिक क्षमता जाणून घेऊन त्यांचे व्यवहारातील विविधांगी उपयोजन लक्षात घ्यायचे आहे.
- मराठी भाषिक कौशल्यांचा विकास अभिप्रेत आहे.
- विविध भाषा कौशल्यांतून मिळणाऱ्या व्यवसायांच्या संधी जाणून घ्यायच्या आहेत.
- पटकथा, संकेतस्थळ कट्टा (ब्लॉग) लेखनाचे स्वरूप जाणून घेऊन ते लेखन कसे करावे हे शिकायचे आहे.

**प्रास्ताविक**

भाषा ही मानवी जीवनाचा अविभाज्य भाग आहे. भाषेद्वारेच आपण बोलतो, रागावतो, प्रेम करतो, विनंती करतो, भाषण-संभाषणे करतो. उपयोगाची ही यादी आणखी खूप वाढवता येईल. जगाची ओळख माणसाला भाषेच्या माध्यमातून होत असते; आणि स्वत:ची ओळख सांगतानाही भाषेचेच माध्यम तो वापरतो. भाषा लवचिक आहे, परिवर्तनशील आहे, अभिव्यक्तीचे समर्थ माध्यम आहे. जीवनाच्या अनेक अंगांसाठी, व्यवहारासाठी आपण भाषेचा उपयोग करीत असतो. हे उपयोजन करीत असताना भाषाऔचित्य राखणे प्रभावी ठरते. व्यक्ती-व्यक्तीतील परस्परातील नाते, काळवेळ, प्रसंग, विषय संदर्भ यावरून भाषेची धाटणी ठरते. भाषा लवचिक असते. आपल्या गरजेनुरूप आपण तिला हवी तशी वळवतो म्हणजेच आकार देतो. जसे औपचारिक ठिकाणी होणारा भाषेचा वापर, कुटुंब, मित्र-परिवार अशा अनौपचारिक ठिकाणी बोलल्या जाणाऱ्या भाषेत अंतर दिसून येते.

आज दैनंदिन व्यवहारातील भाषा वापर व्यापक आणि विविधांगी स्वरूपाचा दिसून येतो. भाषेच्या वापराचे क्षेत्र, भाषा वापरामागचे प्रयोजन, भाषा उपयोगात आणणारी व्यक्ती या दृष्टीने भाषा विकसित होणे गरजेचे आहे. भाषिक नैपुण्य आणि आकलन क्षमता यामुळे प्रकटीकरणाचा आत्मविश्वास बळकट होतो. भाषेच्या आत्मविश्वासपूर्ण प्रभावी वापरासाठी मूलभूत भाषिक कौशल्याची भक्कम पायाभरणी हवी.

## मराठी भाषिक कौशल्ये

भाषा व्यवहार मग तो कुठल्याही प्रकारचा असो सार्थ, सभिप्राय आणि परिणामकारकपणे करता यावा यासाठी खालील भाषिक कौशल्ये संपादित केलेली असावीत.

### • श्रवण

भाषा ही एक सामाजिक संस्था आहे. सहयोग-सहकार्यासाठी परस्पर विनिमयाचे साधन म्हणून भाषा महत्त्वाची आहे. अनुकरणाने मूल भाषा शिकते. आपापल्या बौद्धिक कौशल्याने गरजेनुरूप मूल आपल्या भाषेचा विकास साधते. सभोवतालची परिस्थिती आणि समाज यातून त्याची भाषिक जडणघडण होत असते. या भाषिक संस्कारात श्रवणाचे मोठे महत्त्व आहे. आपण हे जाणताच की भाषा ही अर्जित आहे, अनुकरणातून मानवी मूल भाषा आत्मसात करते. जन्माला आलेल्या बाळाच्या संपर्कात प्रथम त्याची आई येते. ती बोलते ते ऐकून ते मूल तिच्याप्रमाणे बोलण्याचा प्रयत्न करते. स्वाभाविकच आई किंवा कुटुंबीयांकडून प्रथम ते बोलावयास शिकते. तेव्हा श्रवणावर त्याचे लक्ष केंद्रित असते. एखादा उच्चार कसा केला जातो हे ते मूल ऐकते आणि अनुकरणातून आत्मसात करते. श्रवणातून शब्दांचे उच्चार, ऱ्हस्व-दीर्घ लय, उच्चारातील आघात, आरोह-अवरोह हेही श्रवणाने लक्षात येतात. त्याचे अनुकरण करूनच मूल बोलावयास शिकते. हे मूल जसजसे मोठे होते तसे कुटुंब, मित्र, परिसर, शाळा, महाविद्यालय व समाज असा त्याचा वावराचा-संपर्काचा परीघ विस्तारत जातो. तेव्हा भोवतालच्या अनेक गोष्टी, वस्तू, माणसे, प्राणी-पक्षी, त्यांचे नानाविध आकार, आवाज, बोलण्याच्या पद्धती, विचार याचे आकलन श्रवणातून होत असते. वैविध्यपूर्ण समर्पक शब्द त्याच्या श्रवणात येतात. स्वाभाविकच त्यांचा वापर बोलताना व्हायला लागतो. उदा. 'पाणी' हा शब्द आहे. त्यालाच 'नीर', 'जल' व 'जीवन' असे पर्यायही उपलब्ध आहेत. या प्रत्येक शब्दांच्या अर्थछटा लक्षात घेऊन, कोठे कोणता शब्द योजावयाचा हे त्याला ऐकण्याच्या सरावातून लक्षात येते. बोलताना कोठे अल्पसा विराम घ्यायचा? एकापाठोपाठ एकाच प्रकारची उच्चारणे करताना काय करायचे? शब्दांच्या संधी साधताना होणारे बदल, वाक्यरचना... अशा अनेक बाबी श्रवणाद्वारेच आत्मसात होतात. श्रवणाने भाषिक जाण विकसित होते. दैनंदिन जीवन व्यवहारातील सहज बोलण्यासाठी, संवादासाठी, वापरल्या जाणाऱ्या भाषेची तयारी सहजपणे कळत-नकळत श्रवणातून घडत असते.

### • वाचन

वाचन मौन (मनातल्या मनात) किंवा प्रकट असे दोन प्रकारे होते. मनातल्या मनात वाचन हे डोळ्यांनी शब्दांचे केलेले वाचन असते. यात एकाग्रता साधली